| MHSN060016502023 | PWDVA Appln. 50/2023<br>Sou.Rohini Pradip Kamble, etc.1 Vs.<br>Pradip Torna Kamble,etc.2 |
|---|---|

## आदेश नि.क्र.०५ वर

०१. अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचार संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ नुसार अंतरिम खावटी मिळण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार व जाबदार नं. १ हे उभयता पती पत्नी असून उभयंताचा विवाह दि.२१.११.२०११ रोजी आरग येथे संपन्न झालेला आहे. सदर लग्नसंबंधातून अर्जदार हिला जाबदार नं. १ पासून दोन मुली आहेत. लग्न ठरणेपूर्वी जाबदार यांचे कोकळे येथे स्वतःचे घर व शेती आहे. त्यापासून त्यांना भरघोस उत्पन्न मिळते. तसेच जाबदार नं. १ हे ग्रामपंचायत कोकळे येथे नोकरीस आहेत. त्यांना दरमहा ४० ते ५० हजार पगार मिळतो असे सांगितले होते. जाबदार यांच्या घरच्यांनी दिलेल्या हमीवर विश्वास ठेवून ऑक्टोबर २०११ रोजी अर्जदारच्या माहेरी यादीचा कार्यक्रम पार पडला तसेच अर्जदारच्या वडीलांनी लग्नप्रसंगी अर्जदार हिला सोन्याचे दागिने तसेच संसारउपयोगी साहीत्य दिले होते. वर नमूद स्त्रीधनासह सर्व प्रकारचे संसार उपयोगी साहित्य जाबदारांचेकडेच आहेत.

०२. अर्जदारचे पुढे कथन आहे की, लग्नानंतर अर्जदार ही जाबदार नं. १ सोबत सासरी गेली. जाबदार यांनी अर्जदार हिस सुरुवातीचे १५ दिवस चांगले वागणूक दिली. त्यानंतर जाबदार हे अर्जदार यांचेबरोबर क्षुल्लक कारणावरुन भांडणे काढू लागले. जाबदार नं. २ व ३ हे सुध्दा जाबदार नं. १ यास अर्जदारविषयी तक्रार करायचे व जाबदार नं. १ यास फूस लावत होते. जाबदार नं. २ या अर्जदार हिला नीट स्वयंपाक करता येत नाही असे सांगून तीचा छळ करीत होते. जाबदार नं. १ हे जाबदार नं. २ व ३ यांचे

शिकवणीवरुन अर्जदार यांच्यावर संशय घेणे, वाद करणे शिवीगाळ करणे असे प्रकार करु लागले. जाबदार नं. १ यांच्यात होत असलेल्या हा विचीत्र बदल अर्जदार यांना जाणवू लागला होता. परंतु अजा ना उद्या फरक पडेल म्हणून अर्जदार या सर्व जाबदार यांचे मानसिक व शारीरिक छळास दुर्लक्ष करीत राहिल्या. अर्जदार या सुरुवातीपासूनच संसारवत्सल असल्याने जाबदार नं. १ यांचे अर्जदार यांच्याशी अपमानास्पद व घृणास्पद वागणे सहन करीत होत्या. आज ना उद्या परिस्थीती बदलेल या आशेवर रोजचा दिवस कंठीत होत्या.

**०३.** अर्जदारचे पुढे कथन आहे की, दरम्यानच्या काळात अर्जदार हिला दिवस गेले अर्जदार ही गरोदर राहील्याचे सर्व जाबदारांना समजल्यानंतर जाबदार नं. २ ने जाबदार नं. १ ला रोहीणीला बाळ झालेनंतर ते बाळ मला दत्तक दे अशी मागणी केली. त्यावेळी हे सर्व बोलणे एकूण अर्जदार हिस धक्काच बसला. सर्व जाबदार हे अर्जदारविषयी मनात राग ठेवून गरोदरपणातही अर्जदारास शेतात दिवसभर काम करणेस घेऊन जात होते व घरी आले की रात्री उशीरापर्यंत घरातील काम करणेस भाग पाडत होते. अर्जदार हिस औषधोपचारकरीता वडीलांवर विसंबून राहावे लागत होते. त्यानंतर दि. ०१.०९.२०१२ रोजी अर्जदार हिला मुलगी स्वरांजली हिचा जन्म झाला बाळंतपण व बारशेचा सर्व खर्च अर्जदार यांचे वडीलांनी केला. मुलीच्या जन्मानंतर अर्जदार सात महिन्यांनी सासरी स्वरांजली सोबत नांदण्यास गेली. अर्जदार हिला माहेरी फोन करायला देत नव्हते. तसेच अर्जदारचे माहेरचे लोक आले की, त्यांना पाणी सुध्दा विचारत नव्हते. दरम्यानच्या काळामध्ये अर्जदार नं. १ हिला जाबदार नं. १ यांच्यापासून दुस–यांदा गरोदर राहिली. त्यावर जाबदार नं. १ याने तुला दुसरे बाळ होणार आहे ते कायमपणे तुझ्याकडे ठेव व स्वरांजलीला मिनाक्षी सांभाळू दे, असे म्हणाले. त्यावर अर्जदार हिने मी माझी मुलगी कोणास देणार नाही व मी तिच्याशिवाय राहू शकत नाही अशी विनंती केली. मात्र जाबदार नं. १ हे दत्तक देण्याच्या मतास ठाम असल्याने अर्जदार हिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करुन उलट अर्जदार हिला लायकी सोडून जास्त बोलायचे नाही असे म्हणून त्रास देऊ लागले.

**०४.** अर्जदारचे पुढे कथन आहे की, दिनांक २०.०२.२०१४ रोजी अर्जदार हिला दुसरी मुलगी रत्नांजली हिचा जन्म झाला. त्यावेळी देखील अर्जदारचे बाळंतपणाचा व बारशेचा संपूर्ण खर्च अर्जदारच्या वडीलांनी केला. अर्जदार हिला मुलगी झाल्याची बातमी जाबदार नं. १ यांना सांगितले असता जाबदार नं. १ हे अर्जदार हिला पाहणेस आले होते. त्यावेळी जाबदार नं. १ यांनी अर्जदार व तिच्या माहेरच्या लोकांना रोहीणीने माझ्या बहिणीला मोठी मुलगी स्वरांजलीला कायमस्वरुपी दत्तक म्हणून दयावे अन्यथा ही इथेच झुरत बसू दे असे धमकावले व रागावून तेथून निघून गेले. अर्जदार व जाबदार नं. १ हे विभक्त राहू लागलेनंतर जाबदार नं. १ हे अर्जदार ही शेतात काम करणेस पाठवत होते तेंव्हा अर्जदार ही मुलीचा पाळणा घेऊन लहान मुलीला पाळण्यात झोपवायचे व मोठया मुलीला लक्ष देण्यास सांगायचे. अर्जदार ही शेतातील सर्व कामे करुन संध्याकाळी घरी आलेनंतर चुलीवर स्वयंपाक बनवत होती. याऊलट जाबदार नं. १ हे हाताला फ्रॅक्चर असूनदेखील दिवसभर गावात फिरायचे व संध्याकाळी घरी आले की मुली दमवत असले तरी त्यांचेकडे लक्ष देत नव्हते व उलट अर्जदार हीलाच मुलीवरुन शिवीगाळ व मारहाण करायचे.

**०५.** अर्जदारचे पुढे कथन आहे की, तद्नंतर अधुनमधून जाबदार नं. २ ही रत्नांजली हिला घरी बोलावून घेऊन तिचा खाण्यापिण्याचा लाड करायची तिला मोबाईल व टीव्हीची सवय लावली जेणेकरुन स्वरांजली ही अर्जदार हिच्याकडे जावू नये व तसेच जाबदार नं. २ ही रत्नाजंली हिला तुझ्या आईकडे टिव्ही नाही कशाला त्या भिकारडया घरात जातेस अशी शिकवण करायची. त्यानंतर ऑगस्ट २०१६ साली अर्जदार हिची मोठी मुलगी स्वरांजली हिला सोबत घेऊन दुपारचे जेवण करीत असताना जाबदार नं. १ यांनी शिवीगाळ करुन अर्जदारच्या पोटावर लाथ मारले व घाणेरडया प्रकारचे शिवीगाळ करुन बरेवाईट बोलून अर्जदार हिला घरातून नेसत्या वस्त्रासहीत बाहेर काढले. तेंव्हा मुलगी रत्नांजली व स्वरांजली ही राडत होत्या. अर्जदार हिने स्वरांजलीला घेऊन जाण्याचा प्रयत्न केला असता जाबदार नं. ३ यांनी तिला देण्यास नकार दिला व जाबदार नं. १ व २ यांनी घाणेरडे प्रकारची शिवीगाळ करुन घरातून बाहेर काढले. अर्जदार ही माहेरी येऊन दिड वर्ष

झाले होते. जाबदार यांनी अर्जदार हीला सासरी नांदविणेकरीता घेऊन जात नव्हते म्हणून डिसेंबर २०१७ रोजी अर्जदार स्वतः आई, वडील, भाऊ व चुलते हे सर्वजन जाबदार यांचे घरी जाबदार यांना अर्जदार हिला नांदवून घेणेस विनंती केली तरी देखील जाबदार यांनी वडीलधारी माणसांची देखील मान ठेवला नाही व त्यावेळी जाबदार नं. १ यांनी मुलगी स्वरांजली हिला कायदेशीरपणे दत्तक अर्जदार हिने दिलेनंतर अर्जदार हिला नांदवेण अशी मागणी केली. जुन २०२३ रोजी अर्जदार हिचे वडील, चुलते राहुल कांबळे यांनी अर्जदार हिला नांदण्यास पाठविणेकरीता कोकळे येथे घेऊन गेले व जाबदार यांना समजावून सांगण्यास बरेच प्रयत्न केला तरी देखील जाबदार यांनी कोणाचेही ऐकत नव्हते. उलट अज्रदार व तिच्या घरच्यांना तुम्ही किती निर्लज लोक आहात. तुम्हाला कितीदा तरी हाकलले तरी कुत्र्यासारखे परत येतात असे बोलून वडीलधारी माणसांचा अपमान करुन घरातून हाकलून दिले.

०६. तिचे पुढे असे कथन आहे की, अर्जदारचे आईवडिल व इतर नातेवाईकानी अर्जदारला नांदणेस पाठवून देणेचा प्रयत्न केला असता जाबदारांनी अर्जदारास नांदवणेस स्पष्टपणे नकार देवून घटस्फोटाची मागणी केली. अशाप्रकारे अर्जदारला शारीरीक व मानसिक छळ केला व अर्जदारला माहेरी रहाणे भाग पडले आहे. तेव्हापासून जाबदारांनी तिची कोणत्याही प्रकारे चौकशी केली नाही, अथवा तिचे औषधोपचार, कपडालत्ता, दैनंदिन गरजा याबाबत देखील कोणत्याही प्रकारे चौकशी केली नाही.

०७. अर्जदार हिचे पुढे कथन की, जाबदार नं. १ हे कोकळे ग्रामपंचायत येथे नोकरीस असून त्यांना दरमहा ६०,०००/– पगार आहे. तसेच जाबदार नं. १ यांची कोकळे येथे २५ एकर शेती आहे त्यापासून त्यांना दरवर्षी १० ते १५ लाख उत्पन्न मिळते. जाबदार यांचे स्वतःचे घर आहे तसेच घरी दुधाचे म्हैशी असून त्यांना त्यापासून दरमहा २० ते २५ हजार उत्पन्न मिळते. जाबदार यांचे स्थावर तसेच जंगम मालमत्ता आहे. जाबदार यांचे कुटुंब आर्थीकदृष्टया सधन आहे. अशाप्रकारे जाबदार समर्थ असून त्यांनी अर्जदार व

मुलीचे कोणतीही जबाबदारी स्वीकारली नाही. अर्जदार ही तिचे माहेरी आश्रीतासारखे जीवन जगत आहे. तिला स्वतःचे उत्पन्नाचे कोणतेहि साधन नाही, त्यामूळे अर्जदारला जाबदार याचेकडून दरमहा र.रु.३०,०००/– याप्रमाणे पोटगी तसेच जाबदार यांनी अर्जदारला कोणत्याही प्रकारे त्रास देवू नये म्हणून संरक्षण मिळावे. तसेच जाबदारांनी बेकायदेशीरपणे बळजबरीने मुलगी स्वरांजलीचा ताबा घेतला आहे. तिचा ताबा अर्जदार हिला देण्याचा आदेश अर्जदार यांचे वतीने व्हावा. अर्जदार यांचे वैकल्पिक राहणेची व्यवस्था करावी अथवा दरमहा रक्कम रुपये २०,०००/– घरभाडे देण्याचा जाबदार यांना आदेश व्हावा अशी अर्जदारने विनंती करुन सदरचा अर्ज दाखल केला आहे. सबब अर्जदार हिने सदरचा अर्ज मंजूर करावा अशी मागणी केली आहे.

०८. जाबदार नं. १ ते ३ यांनी त्यांचे म्हणणे निशाणी २३ वर दाखल केले आहे. जाबदार यांचे कथन असे की, अर्जदारचा मूळ अर्ज व नि.५ कडील अंतरीम अर्जातील सर्व मजकूर खोटा, चुकीचा, बेकायदेशीर स्वरूपाचा असून तो प्रस्तुत जाबदार यांना मान्य व कबूल नाही. अर्जदार ही जाबदारांसोबत फटकून वागत असत सर्वांना उलटे, उध्दट बोलणे, घरातील कामे न करणे वगैरे गोष्टी करीत असत, त्यांच्या वागण्यात आज ना उद्या बदल होईल या आशेवर जाबदार नं. १ दिवस ढकलत होते. जाबदार नं. १ यांनी अर्जदार हिस समजावून सांगण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु त्या सतत वाद घालत होत्या. सुमारे एक वर्षानंतर वेगवेगळे राहू लागले. अर्जदार नं. १ ही सतत माहेरी जात होती. अर्जदार नं. १ यांचे वडील, भाऊ व आई येऊन कोणासही न सांगता अर्जदार यांना माहेरी घेऊन जात असत. दिनांक २९.०१.२०१७ रोजी जाबदार नं. १ हे अर्जदारास नांदवावयास आणणेकरीता गेले असता अर्जदारचे कुटुंबियांनी जाबदार यांना शिवीगाळ व दमदाटी केली व अर्जदार हिस पाठविणेस नकार दिला. त्यानंतर जाबदारांनी मुलगी रत्नांजलीला देखील दिनांक ०४.१२.२०२० रोजी कोकळे येथे शाळेत पहिलीच्या वर्गात प्रवेश घेतला. परंतु अर्जदारांनी दिनांक ०१.१२.२०२१ रोजी शाळेतून काढून नेऊन आरग येथे नेले. मुलीचे शैक्षणिक नुकसान होते हे लक्षात आणून दिलेनंतर देखील अर्जदार

नांदावयास आल्या नाहीत. अर्जदारांचे एकदंर वर्तन हे नांदावयास येण्याचे नाही. जाबदारांनी वारंवार प्रयत्न करुन देखील नांदावयास न येता नर्सिंग कोर्स पूर्ण केला व बालरोगतज्ञ कारंजे हॉस्पीटल मिरज येथे नोकरी करु लागल्या.

०९. जाबदारांचे पुढे म्हणणे आहे की, जाबदार नं. १ हे मानधन तत्वावर ग्रामपंचायत कोकळे येथे काम करतात त्यांना ६९३०/– एवढे मासिक मानधन मिळते. तसेच जाबदार नं. १ व ३ यांचेत समाईकात गाव कोकळे येथे गट नं. ८६६ मध्ये २.४९.५०, गट नं. ९३९/२ मध्ये २.२१.५० इतका तर गट नं. ११५० मध्ये ०.०१.५० इतके क्षेत्र आहे. सदरची जमीन कोरडवाहू आहे. त्यामध्ये नगदी पिके येत नाहीत. अर्जदारांचे सर्व कथन अवास्तव वाढवून फुगवून लावले आहे. तसेच जाबदारांचेकडे म्हैशी नाहीत. जाबदार नं. १ यांनी कोकळे विविध विकास सहकारी सोसायटी लि. कोकळे यांचेकडून कर्ज घेतलेले असून र.रु. ५२,०००/– अद्याप देणेबाकी आहे. तसेच श्रीराम सिटी युनियन फायनान्सचे पर्सनल लोन र.रु. ५३,३७२/– इतके आहे. त्यामुळे अल्प व तुंटपुंज्या पगारात जाबदारांचे भागत नाही. तसेच अज्रदार नांदत नाहीत म्हणून त्यांना गावात भावकीत व नातेवाईकांत मानहानीस तोंड द्यावे लागले. त्यामुळे ते पूर्णतः खचून गेले आहे. त्यांना आता पूर्वीसारखे काम जमत नाही व अर्जदारची अवास्तव मागणी पूर्ण करु शकत नाहीत. अर्जदार आता सध्या मिरज येथील सेवासदन या मोठया मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पीटलमध्ये नर्स म्हणून काम करतात व त्यांना दरमहा सुमारे र.रु. २६,०००/– इतका पगार आहे. त्यामुळे त्या स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास समर्थ आहे. जाबदार कुटुंबिय हे केवळ तुटपुंज्या आर्थिक स्त्रोतावर चालते. त्यामुळे सदर कलमांमध्ये नमूद आर्थिक उत्पनाबाबतची सर्व कथने खोटी व चुकीची आहेत. वास्तविक पाहता जाबदार नं. १ हे अर्जदारांना स्वतंत्रपणे पोटगी देवू शकत नाहीत. तसेच जाबदार नं. १ यांनी अर्जदार नं. १ यांचा कधीही स्वत:हून त्याग केलेला नव्हता व नाही. वास्तविक पाहता अर्जदार या देखील सुशिक्षित असून त्या स्वतः आर्थिकदृष्टया सक्षम आहेत. जाबदार यांनी अर्जदार यांना कधीही शारिरीक व मानसिक त्रास दिलेला नाही. त्यामुळे अर्जदारने जाबदार यांना

मानसिक त्रास देणेच्या हेतुने प्रस्तुत अर्ज दाखल करुन कोणत्याही प्रकारचे कारण घडलेले नसताना अर्जदारनेच जाबदार नं. १ यांचा त्याग केलेला आहे व ती माहेरी निघून गेली आहे. सबब अर्जदार हिने सदरचा अर्ज केवळ जाबदारांना त्रास देण्यासाठी केला असल्याने अर्जदाराची मागणी बेकायदा असल्याने फेटाळण्यास यावी अशी विनंती केली आहे.

१०. अर्जदाराचा अर्ज लक्षात घेता असे आढळून येते की, जाबदारांनी अर्जदार हिने कथित केलेले सर्व आरोप अविश्वासार्ह मानण्याइतपत कोणत्याही बाबी न्यायालयासमोर आणलेल्या नाहीत. तसेच जाबदारांनी अर्जदार वर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सद्य स्थितीला अर्जदार हिने कथित केलेल्या कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरुप व गांभीर्य लक्षात घेता जाबदार हे अर्जदार हिचेवर कौटुंबिक हिंसाचार करत असल्याची बाब सकृतदर्शनी दिसून येते. त्याचप्रमाणे अर्जदार ही तिच्या माहेरी राहत असुन ती माहेरी असतांना जाबदारांनी अर्जदाराची कोणतीही व्यवस्था केली नाही. अर्जदार ही जाबदार क्र.१ याची पत्नी असल्याची बाब सकृतदर्शनी दिसून येते. त्यामुळे अर्जदाराचे पालनपोषण करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही जाबदार क्र.१ याची आहे. अर्जदार हिचे कथनानुसार जाबदार क्र १ हा नोकरी करीत असून त्यास दरमहा ६० हजार रुपये इतके उत्पन्न आहे. परंतु त्याबाबत कोणताही कागदोपत्री दस्त अर्जदाराने प्रकरणात दाखल केला नाही. अर्जदार हिने अन्न, वस्त्र, निवाराकरीता अर्जदार हिस प्रत्येकी प्रतिमहा रक्कम रुपये ३०,०००/– तसेच जाबदारांनी अर्जदारास त्रास देऊ नये असा प्रतिबंधीत मनाई आदेश त्यांच्याविरुध्द व्हावा अशीही मागणी केली आहे. दोन्ही पक्षाचे सबंध लक्षात घेता अर्जदार ही कौटुंबिक हिंसाचार अधिनियम २००५ नुसार अंतरिम खावटीचा आदेश प्राप्त करण्यास पात्र प्रथमदर्शनी दिसुन येते. अर्जदार स्वतःचा उदरनिर्वाह करु शकत नाही. त्यामुळे तिला अंतरिम खावटीची आवश्यकता आहे. म्हणुन अर्जदार ही अंतरीम खावटी मिळण्यास पात्र आहे.

**११.** अर्जदाराचे कथन, दोन्ही वकीलांचा युक्तीवाद व दाखल केलेले कागदपत्र लक्षात घेवुन तसेच अर्जदाराचा राहणीमानाचा स्तर, जाबदार नं. १ यांचे उत्पन्न लक्षात घेता अर्जदार हिला दरमहा रुपये ३,०००/– (तीन हजार रुपये फक्त) अंतरीम खावटी देणे योग्य होईल. म्हणुन मी खालील आदेश पारीत करते.

**<u>आ दे श</u>**

| | |
|---|---|
| १ | अर्जदाराचा अर्ज अशंतः मंजुर करण्यात येतो. |
| २ | जाबदार क्र.१ याने अर्जदार हिला खावटी दरमहा रुपये ३,०००/– (अक्षरी तीन हजार रुपये फक्त) मुख्य अर्ज निकाली लागेपावेतो या अर्जाच्या दिनांकापासुन दयावी. |
| ३ | सदर आदेशाची प्रत अर्जदारांना विनामुल्य देण्यात यावी. |

RANJANA VIJAY KAMBLE

Digitally signed by RANJANA VIJAY KAMBLE
Date: 2025.02.07 16:34:43 +0530

दि. ०५.०२.२०२५.

(सौ.रंजना विजय कांबळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
दुसरे कोर्ट मिरज.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. S. S. Shingana | | |
| Name of Court | :- | 2nd Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Miraj, Dist., Sangli. | | |
| Date of decision / typed | :- | 05 | 02 | 2025 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 06 | 02 | 2025 |
| Judgment/order uploaded on | :- | 07 | 02 | 2025 |